पुण्य नगरी
# आरोग्यजागर
उत्तम आरोग्य । उज्ज्वल भविष्य । पुणे, मंगळवार, ७ एप्रिल २०१५

# होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युअल हॅनेमान





होमिओपॅथी
चिकित्सा व उपचार
डॉ. अमरसिंह निकम

होमिओपॅथी या उपचारपद्धतीची माहिती देताना होमिओपॅथीचे जनक असलेले महान जर्मन शास्त्रज्ञ डॉ. सॅम्युअल हॅनेमान यां ाचा परिचय करून देणे आवश्यक आहे. त्यांच्या अथक परिश्रमामुळे आणि संशोधनांमुळेच जगभर होमिओपॅथी लोकप्रिय झाली. शरीरावर कुठलेही दुष्परिणाम (साईड इफेक्ट) न करता हजारो रुग्णांना दुर्धर आजार, अनुवंशिक आजार, साथीचे आजार, अल्पकालीन आजार, दीर्घकालीन आजार अशा मोठमोठ्या घातक आजारांपासून सर्दी, पडसे अशा सामान्य आजारांवरदेखील या औषधाने मात करून लक्षावधी रुग्णांना रोगमुक्त केले. या विश्वमानवाने प्राणिमात्रांसाठी आणि मानवासाठी होमिओपॅथीचा शोध लावून संजीवनीसारख्या औषधाचा ठेवा दिला. अशा या डॉ. सॅम्युअल हॅनेमान यांचा अल्पपरिचय या लेखमालेच्या आरंभीच करून देणे औचित्याचे ठरेल.

डॉ. सॅम्युअल हॅनेमान यांचा जन्म १० एप्रिल १७५५ साली जर्मनीतील येथील मिसेन या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील नक्षीकाम व रंगकामात प्रवीण होते. डॉ. हॅनेमान हे अत्यंत हुशार विद्यार्थी म्हणून शाळेत प्रसिद्ध होते. लहान असतानाच त्यांनी मानवी विषयावर बारकाईने निरीक्षण करून एक निबंध लिहिला. हा निबंध पाहून शाळेतील शिक्षकदेखील अचंबित झाले.

शास्त्र आणि विविध भाषा हे त्यांचे आवडीचे विषय. त्यांचे इंग्रजी, फ्रेंच, लॅटिन, ग्रीक या भाषांवर चांगले प्रभुत्व होते. त्यांच्या या असामान्य बुद्धिमत्तेला चिकित्साशास्त्र संशोधनाची ओढ लागलेली होती. १७७५ मध्ये त्यांना लिगझिन युनिव्हर्सिटीत वैद्यकीय शाखेत प्रवेश मिळाला. वैद्यकीय शिक्षण घेत असताना, तसेच त्यांनी ॲलोपॅथिक मेडिसिनमध्ये एम. डी. ग्रॅज्युएशन युनिव्हर्सिटी ऑफ एनलारजेन युनिव्हर्सिटी येथे १७७९ रोजी पूर्ण केले. कॉलेज चालू असताना डॉ. हॅनेमान यांना त्या काळातील वैद्यकीय चिकित्सापद्धतीत त्रुटी व दोष आढळले आणि या चिकित्सापद्धतीबाबत त्यांचा पूर्णतः भ्रमनिरास झाला. त्यांनी पुढे शरीररचनाशास्त्र, रसायनशास्त्र यांचा सखोल अभ्यास चालू ठेवला. त्या काळातील वेगवेगळ्या चिकित्सापद्धतींवर त्यांनी लेखांद्वारे टीकेची झोड उठवली. १७८१ साली त्यांनी औषधनिर्माण शास्त्राचा (फार्मसी) अभ्यास केला. त्याच वर्षी त्यांचे एका जर्मन युवतीशी लग्न झाले.

१७९० साली विल्यम कुलिन लिखित 'मटेरिया मेडिका'चे जर्मनीत रूपांतर करीत असताना सिनकोना या औषधांच्या वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्मांचे आकलन त्यांना झाले. सिनकोना (चायना) या औषधाच्या झाडाची साल चाटल्याने मलेरियासारख्या आजाराची लक्षणे दिसू लागतात. या टिप्पणीचा त्यांनी सखोल अभ्यास केला आणि त्यांना आनंदाश्चर्य वाटले. त्यांनी स्वतःवर या औषधाचा अभ्यास केला आणि त्यांच्या शरीरात हिवतापाची लक्षणे दिसू लागली. निरोगी माणसामध्ये या औषधांच्या अल्पशः सेवनाने कृत्रिम रोग लक्षणे तयार होऊ शकतात या तत्त्वाच्या आधारावर त्यांनी स्वतःवर प्रयोग करीत असंख्य होमिओपॅथिक औषधांचा शोध लावला.

आपले विविध प्रयोग पूर्ण केल्यानंतर १७९६ मध्ये त्यांनी जगासमोर एका नव्या शास्त्राच्या रूपाने होमिओपॅथीचा अधिकृत शोध प्रकट केला. त्यांना आढळून आलेली होमिओपॅथिक औषधे ही शीघ्र आणि मृदुल असून, अतिशय जलद आरोग्याची पुनर्स्थापना ती करू शकतात, या औषधांद्वारे जगासमोर सिमिला, सिमिलिबस्, कुरेटटर, समः समम समयति या तत्त्वाचा, या मंत्राचा उद्घोष केला आणि होमिओपॅथी नामक एका नवीन शास्त्रीय तत्त्वाची, ज्ञानाची जगाला ओळख झाली. 'ऑरगॅनोन ऑफ मेडिसिन' या ग्रंथाचा शोध लावत असताना चैतन्यशक्ती प्रथम पडते. त्यानंतर शरीर आजारी पडते, हा शोध त्यांनी लावला. चैतन्यशक्ती ही सूक्ष्म असून, शक्तिशाली आहे. अशा या सूक्ष्म चैतन्यशक्तीला चेतना देऊन त्यांच्यातील आजारपण दूर करून शरीरात नवचैतन्य प्राप्त करून देण्याचे सामर्थ्य होमिओपॅथिक औषधात आहे, हे त्यांच्या संशोधनाने सिद्ध झाले.

पुढे त्यांनी होमिओपॅथिक औषधांच्या सूक्ष्मीकरणाचा शोध लावला. (औषध सूक्ष्म केल्याने त्यातील नैसर्गिक औषधीतत्त्व शक्तिशाली होते.) आणि होमिओपॅथीचा शोध लागला. १८२१ मध्ये डॉ. हॅनेमान यांना युरोप खंडात खूपच प्रसिद्धी मिळाली आणि त्यांचा होमिओपॅथीचा शोध जगभर पसरू लागला. १८२८ साली त्यांनी 'टॉनिक डिसीज' या नावाचा ग्रंथ संशोधन करून लिहिला. मानवी शरीरातील आनुवंशिक दोष, जीर्ण दोष कसे दूर करावेत, यावर हा ग्रंथ होता. त्याने युरोप खंडातील रोग्यांचा डॉ. हॅनेमान यांच्याकडे ओघ सुरू झाला. मात्र, त्याचबरोबर स्थानिक स्पर्धकांमध्ये मत्सर तयार होऊन डॉ. हॅनेमान यांना बऱ्याच त्रासाला तोंड द्यावे लागले. त्याच दरम्यान म्हणजे १८३० मध्ये त्यांच्या पत्नीचे निधन झाले. त्यांना ११ मुले होती. हेवेदावे, मत्सर यामुळे त्रस्त झालेल्या हॅनेमान यांना जर्मनी सोडून हंगेरी, ऑस्ट्रिया यासारख्या ठिकाणी स्थलांतर करावे लागले. याच काळात जर्मन मारिया नावाच्या फ्रेंच मुलीशी त्यांचा परिचय झाला. ती त्यांची पेशंट होती. तिने डॉ. हॅनेमान यांना स्थिर आणि शांत प्रॅक्टिससाठी पॅरिसला येण्याची सूचना केली. हॅनेमान यांनी ते मान्य केले आणि पुढील दोन वर्षात ते पॅरिसला रवाना झाले. १८३५ मध्ये त्यांनी मारियाशी पॅरिसमध्ये विवाह केला. २ जुलै १८८२ साली वयाच्या ८८ व्या वर्षी डॉ. हॅनेमान यांनी जगाचा निरोप घेतला. डॉ. हॅनेमान यांच्या मार्टिन होमिन बर्ड या होमिओपॅथिक शिष्याने १८३९ साली महाराजा रणजितसिंग यांच्यावर उपचार करून त्यांना अर्धांगवायूच्या आजारातून मुक्त केले आणि होमिओपॅथीचा आशिया खंडासह जगभरामध्ये साम्राज्य प्रसार केला.

आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल
ॲण्ड हिलिंग सेंटर,
मो. ९८२२०४१८४७

# अन्न ठेवूया सुरक्षित, शेतापासून ताटापर्यंत

**आज (७ एप्रिल) साजऱ्या होत असलेल्या जागतिक आरोग्य दिनानिमित्त प्रासंगिक लेख**

जागतिक आरोग्य संघटनेचा स्थापना दिन ७ एप्रिल हा जागतिक आरोग्य दिन म्हणून दरवर्षी सर्वत्र साजरा केला जातो. जागतिक स्तरावर जनजागृतीसाठी दरवर्षी या दिवसाची आरोग्यविषयक संकल्पना आणि घोषवाक्य असते. 'अन्न ठेवूया सुरक्षित, शेतापासून ताटापर्यंत' ही यावेळची संकल्पना आहे.

अन्न ही मानवाची मूलभूत गरज आहे. प्रत्येक व्यक्तीला कर्बोदके, प्रथिने, मेद, जीवनसत्त्वे आणि खनिजे यांनी युक्त संतुलित आहार निरोगी जीवनासाठी आवश्यक आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार सध्या जगभरात दूषित अन्नामुळे होणारे आजार (फूड बॉर्न डिसीज) हा चिंतेचा विषय आहे. दूषित अन्नाद्वारे अतिसार ते कर्करोग अशा दोनशेहून अधिक आजारांची लागण होऊ शकते. दरवर्षी सुमारे दोन दशलक्ष मृत्यू हे अतिसारामुळे होतात. याचे मूळ कारण बहुतांशी दूषित अन्न वा पाणी हे असते. शेतापासून घरापर्यंतच्या प्रवासात अन्न दूषित झाल्यामुळे या आजारांना निमंत्रण मिळते.

जागतिक आरोग्य दिनाची 'अन्न सुरक्षितते'ची संकल्पना मूर्त स्वरूपात साकार होण्यासाठी शासन, स्वयंसेवी संस्था, शेतकरी, अन्नधान्याचे पुरवठादार, उपभोक्ते ग्राहक आणि वैद्यकीय सेवा देणारे डॉक्टर्स या सर्व समाज घटकांचा सहभाग आवश्यक आहे. उपचारापेक्षा प्रतिबंध उत्तम म्हणून सर्व स्तरांवर प्रतिबंधात्मक उपाययोजना, आरोग्यशिक्षण व कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने 'अन्न सुरक्षिततेसाठी खालील पंचसूत्री दिली आहे.

**सूत्र एक :** स्वच्छता ठेवा. माती, पाणी आणि प्राणी व मनुष्यांत असणारे घातक जीवजंतू हात, कपडे, भांडी यांच्या संपर्कातून अन्नाद्वारे आजारांना निमंत्रण देतात. म्हणून अन्नपदार्थ हाताळताना, तसेच स्वयंपाकादरम्यान अन्न शिजविताना हात स्वच्छ धुवा. शौचाहून आल्यानंतर हात साबणाने धुवा. माश्या, कीटक, झुरळे इ. पासून सुरक्षित ठेवा.

**सूत्र दोन :** कच्चे आणि शिजवलेले अन्नपदार्थ वेगळे ठेवा. मांस, सी फूड यातील घातक जीवजंतू अन्नपदार्थ बनविताना शिजवलेले अन्न दूषित करू शकतात. म्हणून कच्चे अन्नपदार्थ वेगळ्या भांड्यांत ठेवा.

**सूत्र तीन :** अन्न पूर्णपणे शिजवा. मांस, पोल्ट्री अन्नपदार्थ इ. मध्ये घातक जीवजंतू असू शकतात. ७० अंश सें. तापमानापर्यंत अन्न शिजविल्यास अन्न खाण्यासाठी सुरक्षित बनते. अन्न पूर्णपणे शिजवा.

**सूत्र चार :** सुरक्षित तापमानावर अन्न साठवा. दोन तासांपेक्षा जास्त वेळ शिजवलेले अन्न सामान्य तापमानात ठेवू नका. शिजविलेले आणि नाशवंत अन्नपदार्थ ५ अंश सें.पेक्षा कमी तापमानात रेफ्रिजरेटरमध्ये साठवा. खूप काळ रेफ्रिजरेटरमध्ये अन्नपदार्थ साठविणे हितावह नसते.

सूत्र पाच : सुरक्षित पाणी आणि कच्चे पदार्थ वापरा. पाणी, बर्फ, कच्चे पदार्थ यात घातक जीवजंतू, घातक रसायने असू शकतात. ताजा



भाजीपाला वापरा, पाश्चराइज्ड दूध वापरा, फळे व भाजीपाला स्वच्छ धुवून घ्या. अन्नपदार्थ पॅकबंद असल्यास एक्स्पायरी दिनांकापूर्वीच वापरा.

भारतात भेसळ प्रतिबंधक कायदा १९५४ अस्तित्वात होता. त्यानंतर फूड सेफ्टी अँड स्टँडर्ड्स ॲक्ट २००६ अस्तित्वात आला. कायद्याबरोबर जनजागृती व आरोग्यशिक्षणाची नितांत आवश्यकता आहे. तेव्हाच अन्न ठेवूया सुरक्षित, शेतापासून ताटापर्यंत ही संकल्पना साकार होईल व अन्न हे पूर्णब्रह्म ठरेल.

डॉ. सोमनाथ सलगर
सहयोगी प्राध्यापक,
जीवरसायनशास्त्र. बै. जी. शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय, पुणे
संपर्क : ९८८१२८७०६५

# इंजिनिअर तरुणीवर लग्नाच्या आमिषाने बलात्कार

**वाहनचालक आरोपीला अटक**
**गुन्ह्यात पत्नीचाही समावेश**

**पुणे :** एअरक्राफ्टमधील इंजिनिअर तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर बलात्कार करणाऱ्या वाहनचालकाला चंदननगर पोलिसांनी अटक केली आहे. बालाजी सुभाष कांबळे (३१, रा. फुलचिंचोली, ता. पंढरपूर, जि. सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. न्यायालयाने त्याला १० एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. यामध्ये त्याची पत्नी दीपालीनेही त्याला साथ दिली आहे.

पीडित तरुणी ही एअरक्राफ्ट इंजिनिअर असून, ती पुण्यात एका ठिकाणी काम करीत होती. ती ज्या कंपनीत काम करीत होती त्याच कंपनीत कर्मचाऱ्यांची ने-आण करण्याचे काम आरोपी बालाजी करीत होता. तिला सोडण्याचे काम करीत असताना बालाजीने पीडित तरुणीबरोबर ओळख वाढवली. तिला अविवाहित असल्याचे सांगून लग्न करण्याचे आमिष दाखविले. याच दरम्यान तिच्यावर बलात्कार केला. याच दरम्यान, या गैरकृत्याचे त्याने नजर चुकवून फोटोही काढले. पिस्तूल कानाखाली लावून झालेला प्रकार कोणास सांगितल्यास तुला आणि तुझ्या घरच्यांना गोळ्या घालून मारण्याची धमकी दिली. तसेच नेटवर फोटो टाकून बदनामी करण्याची धमकी दिली. याप्रकरणी फिर्यादी महिलेने सुरुवातीला अकलूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. तो गुन्हा चंदननगर पोलिसांकडे वर्ग करण्यात आला. आरोपीने तरुणीच्या काढलेल्या फोटोचे मेमरी कार्ड, धमकीची चिठ्ठी तिच्या घरी कुरिअरने पाठवून दिली. आरोपी दाम्पत्याला तीन मुले असून, लग्न झालेले असतानाही आरोपीने लग्न झाल्याचे लपविले आहे, आरोपीच्या पत्नीला अटक करायची आहे, आरोपीची वैद्यकीय चाचणी करायची असल्याने सरकारी वकील वामन कोळी यांनी आरोपीच्या पोलीस कोठडीची मागणी केली. न्यायालयाने आरोपीला दि. १० एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे.




# स्वाइन फ्लूने दोघांचा मृत्यू बळींची संख्या ८१

**पुणे : प्रतिनिधी**

शहरात स्वाइन फ्लूचे थैमान सुरूच असून, या आजारामुळे आणखी दोन रुग्णांचा बळी गेला आहे. शहरात स्वाइन फ्लूने मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या आता ८१ झाली आहे. सध्या ९ रुग्ण अत्यवस्थ असून, त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले आहे.

शहरातील सध्याचे विचित्र वातावरण स्वाइन फ्लू वेगाने पसरण्यास कारणीभूत ठरले आहे. सध्या महानगरपालिकेच्या व खासगी रुग्णालयांत स्वाइन फ्लूच्या रुग्णांची तपासणी करण्यात येत आहे. १ जानेवारीपासून आजअखेर १ लाख ३३ हजार १९९ संशयित स्वाइन फ्लूच्या रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे. त्यातील १६ हजार ९८६ रुग्णांना टॅमी फ्लूची औषधे देण्यात आली आहेत.

सोमवारी २ हजार ३१२ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यातील ११६ रुग्णांना टॅमी फ्लूच्या गोळ्या देण्यात आल्या, तर २ रुग्णांना स्वाइन फ्लू झाल्याचे दिसून आले. आजारामुळे जानेवारीपासून शहरात ८१ रुग्णांचा मृत्यू झाला. सध्या २१ रुग्णांवर जनरल वॉर्डमध्ये उपचार सुरू आहेत. गेल्या वर्षात ११ रुग्णांचा त्यामुळे मृत्यू झाला होता. शहरातील २ लाख ४६ हजार ३०१ नागरिकांची स्वाइन फ्लूची तपासणी करण्यात आली.

# 'व्हीकेआयटी'चा परेश जोशी बोर्डात प्रथम

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळातर्फे जानेवारीमध्ये घेतल्या गेलेल्या अंतिम परीक्षांचे निकाल जाहीर झाले असून, लॅण्ड सर्व्हेईंग जमीन मोजणी अभ्यासक्रमामध्ये औंध येथील विमलकुमार इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (व्हीकेआयटी) या संस्थेचा परेश जोशी बोर्डात ८२.२५ टक्के गुण मिळवून प्रथम आला. अमित पवार, विश्वास पाटील या विद्यार्थ्यांनीही विशेष प्रावीण्य मिळविले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन राजस जैन, अधिष्ठाता ब्रिगेडिअर पुष्पलडे यांनी अभिनंदन केले आहे. संस्थेचा निकाल ९४ टक्के लागल्याची माहिती प्राचार्य पांडुरंग सुपेकर यांनी दिली.

## आपलं व्यासपीठ

### नदीचे प्रदूषण थांबवणे गरजेचे



आज नद्यांच्या पाणी प्रदूषणाचा अत्यंत गंभीर असा प्रश्न आपल्यासमोर उभा आहे. आजही शहरांमधील कारखान्यातून रसायनमिश्रीत व खेडेगावामध्ये सांडपाण्याची विल्हेवाट लावण्याची स्वतंत्र व्यवस्था नाही. ती नसल्यामुळे सांडपाणी नदीत सोडले जात आहे. त्यामुळे नद्या प्रचंड प्रदूषित झाले आहे. फक्त नदीच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या गावांना यामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. आज हे सांडपाणी नदीत मिसळल्याने पाण्याचा वापर करणे अशक्य झाले आहे. त्यातूनच पाण्याचा प्रश्न निर्माण झाला. तसेच प्रदुषित पाणी वापराने अनेक आजारांना तोंड द्यावे लागत आहे. आज मोठ्या प्रमाणावर तीर्थस्थळावरील नद्यांची अवस्था वाईट झाली आहे. घरातील मंदिरातील निर्माल्य नदीत टाकणे, अंत्यसंस्कारानंतर जे साहित्य निर्माण होते ते नदीत फेकणे, पाण्यात आंघोळ करणे, अशा अनेक कारणांनी एकेकाळी स्वच्छ असणाऱ्या, सुंदर दिसणाऱ्या नद्या आज गटारगंगा बनल्या आहे.

आज नदीची शुद्धता व एकाअर्थी पावित्र्य जपणे गरजेचे बनले आहे. त्यामुळे सर्वांनी मिळून नदीचे होणारे प्रदूषण थांबवणे गरजेचे आहे.

**रोहिदास जगताप**
**पाबळ ता. शिरूर जि. पुणे**

**टीप :** आपल्या परिसरातील समस्यांबाबत आपली मते १०० ते १५० शब्दांत आपल्या छायाचित्रासह व पत्त्यासह खालील पत्त्यावर पाठवावीत.

पत्ता : दैनिक 'पुण्य नगरी' बहिरट पाटील आर्केड, दुसरा मजला, बालगंधर्व चौक, शिवाजीनगर, पुणे - ५. Email : ambika.pune@gmail.com

### वाचकांच्या माहितीसाठी

सोमवारच्या अंकात प्रसिध्द झालेल्या 'ती चे आरोग्य' या सदराच्या लेखिका डॉ. सुप्रिया पुराणिक यांचा संपर्क क्रमांक अनावधानाने चुकीचा प्रसिध्द झाला असून तो ९८२२०४७६६७ असा आहे, याची नोंद घ्यावी.

## यूथ Talkers

**फुलराणी सायना नेहवाल हिची नुकतीच विश्व बॅडमिंटन फेडरेशनतर्फे या वर्षातील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड करण्यात आली होती. फेडरेशनच्या सिएल येथे झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला होता. मात्र सध्या सायना नेहवालने जागतिक क्रमवारीतील अग्रस्थान गमावले असले, तरी काही दिवसांतच हे स्थान पुन्हा मिळविण्याची तिला संधी आहे. त्याबाबत तरुणांमधील ही उत्सुकता...**

### सुवर्णसंधी



सर्वोत्तम उदयोन्मुख खेळाडू पुरस्काराची मानकरी ठरलेली सायना पहिली भारतीय महिला बॅडमिंटनपटू आहे. बीजिंग ऑलिंपिकमध्येही सायनाने उपांत्यपूर्व फेरीपर्यंत मजल मारली होती. सध्या सायनाच्या अव्वल स्थानासाठी असलेल्या प्रतिस्पर्धी कॅरोलिना मरिन, तसेच ली झुएरुई यांनी सिंगापूर स्पर्धेतून यापूर्वीच घेतलेली माघार सायनाच्या पथ्यावर पडेल.

**गौरी सावंत**

### क्रिकेटप्रमाणेच स्थिती



जागतिक बॅडमिंटनची क्रमवारी कोणी कोणास हरवले यावर निश्चित होत नाही, तर खेळाडूंनी कोणत्या स्पर्धेत किती वाटचाल केली, यावर अवलंबून असते. क्रिकेटसारख्या अनेक खेळांत, समजा बांगलादेशने ऑस्ट्रेलियास हरवले, तर बांगलाचे मानांकन गुण वाढतात, तसेच ऑस्ट्रेलियाचे कमी होतात. अर्थातच सायनाने कॅरोलिना मरिन, तसेच ली झुएरुई यांच्या अनुपस्थितीचा फायदा घेत सिंगापूर स्पर्धा जिंकली, तर त्याचा तिला मानांकन गुण उंचावण्यात फायदा होईल.

**धनंजय भगत**

### उपांत्य, अंतिम फेरीपर्यंत मजल मारावी लागेल



सायनाने सिंगापूर स्पर्धेत फारसे यश मिळविले नाही, तरी तिला सहभागाचे गुणही मिळतील. त्याचवेळी समजा कॅरोलिना इंडोनेशियात जिंकली, तरी ती ७६ हजार ५७८ गुणांपर्यंतच जाईल, तर सायनाचे गुण ८० हजार १९१ आहेत. सिंगापूर स्पर्धेत खेळणार नसल्यामुळे गतवर्षीच्या उपविजेतेपदाच्या गुणांवर तिला पाणी सोडावे लागेल. हे सर्व सायनाच्या पथ्यावर पडेल.

**महेंद्र धायगुडे**

या सदरांतर्गत तुम्हीही आपली मते व अनुभव मांडू शकता. तुमची मते बहिरट पाटील आर्केड, दुसरा मजला, बालगंधर्व चौक, शिवाजीनगर, पुणे-५ या पत्त्यावर किंवा ambika.pune@gmail.com या मेल आयडीवर पासपोर्ट साइज फोटोसह पाठवावीत.